# ई - पोलीस पत्रिका

दि १८/१२/२०२३ अनु.क्र.२२४

## (अमरावती शहर पोलीसांची २०२३ ची उद्दिष्टे)

- नागरिकांशी मित्रत्वाचे संबध.
- उच्च मनोबल युक्तव तणाव मुक्त पोलीस दल.
- महिला, मुले व ज्येष्ठ नागरिकांची सुरक्षा.
- जातीय सलोखा वाढविणे.
- संघटित गुन्हेगारी आणि आतंकवादी यांचे विरूद्ध कठोर कारवाई.
- रस्त्यावरील गुन्हेगारीवर नियंत्रण/सुरक्षा.
- पोलीस कोठडीत गुन्हे घडू नदेणे.
- आरोपी पोलीसांचे ताब्यातून पळून जाऊ नयेत.
- "सुरक्षित व सुखकर अमरावती" हा आमचा संकल्प आम्ही व्यापक लोक सहभागातून साध्य करू.

## भाग-१

## पदोन्नती/बदली/प्रशिक्षण/रजा

### रजा

**१.पोआअ/आस्था-५/बालसंगोपन रजा/१५२४७/२०२३ अमरावती शहर दिनांक १३/१२/२०२३**

### आदेश

खालील नमुद महिला पोलीस अंमलदार यांना त्यांचे नावासमोर दर्शविलेल्या कालावधी करीता त्यांचे बाळाचे संगोपन करीता विशेष रजा शासननिर्णय, वित्त विभाग क्रमांक संकीर्ण-२०१७/प्र.क्रं.२५/सेवा-६, दिनांक २३/७/२०१८ मधील तरतुदीनुसार अटी व शर्तीचे अधिन राहून बालसंगोपन रजा मंजुर करण्यात येत आहे.

| अ. क्र. | पदनाम/ब.नं./नाव, व नेमणूक | प्रसुतीचा दिनांक | अपत्यांची संख्या | रजा कोणत्या अपत्या करीता | यापुर्वीउपभोगलेली रजा | मंजुर केलेली रजा |
|---|---|---|---|---|---|---|
| १ | मपोशि/११२९, पुनम ग.गायकवाड (गाठे) पोलीस मुख्यालय | २९/०५/२०२३ | २ | दुस-या | प्रसुतीला जोडुन | ६०दिवस |

**अटी व शर्ती :-**

१ मुलाचे वय १८ वर्षे होई पर्यंत सदर रजा लागु राहील.

२. एका वर्षामध्ये कमाल २ महिन्याच्या कमाल मर्यादेत सदर रजा घेता येईल.

३. पहिल्या दोन जेष्टतम हयात मुलांकरीता सदर रजा लागु रहील.

४. उपरोक्त महिला कर्मचाऱ्यांना बालसंगोपन रजेच्या कालावधीसाठी रजेवर जाण्याच्या लगतपुर्वी जेवढे वेतन मिळत असेल तेवढीच रजा वेतन देण्यात येईल.

५. सदर कालावधीत रजा प्रवास सवलत (LTC) अनुज्ञेय ठरनार नाही.

**२.पोआअ/पशा-१/अर्जित रजा/पो.अधि./१२०४२/२०२३ अमरावती शहर दिनांक ०१/११/२०२३**

### आदेश

अमरावती शहर या पोलीस घटकातील खालील नमुद पोलीस अधिकारी यांना त्यांचे नावासमोर दर्शविलेल्या कालावधीत **अर्जित रजा मंजुर** करण्यात येत आहे.

| अ. क्र | पोलीस अधिकारी यांचे नाव व पदनाम | नेमणुकीचे ठिकाण/ पो. स्टे | रजेचा प्रकार | कालावधी | कार्यभार सांभाळणार |
|---|---|---|---|---|---|

| | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| ०१ | श्री. पुंडलिक मेश्राम पोलीस निरीक्षक | पोलीस कल्याण शाखा | अर्जित रजा | दि. ११.११.२०२३ ते ०५.१२.२०२३ पर्यंत २५ दिवस, | श्री. गजानन तामटे, पोलीस निरीक्षक, पो. स्टे. सायबर |

**३.पोआअ/पशा-१/पो.अधि.रुग्न कालावधी/११९८३/२०२३ अमरावती शहर दिनांक ०१/११/२०२३**

## आदेश

अमरावती शहर या पोलीस घटकातील खालील नमुद पोलीस अधिकारी यांचा त्यांचे नावासमोर दर्शविण्यात आलेला रुग्ननिवेदन कालावधी त्यांनी सादर केलेल्या वैद्यकीय प्रमाणपत्र तसेच शिल्लक रजा चे अनुषंगाने महाराष्ट्र नागरी सेवा, रजा नियम १९८१ मधील तरतुदी अन्वये त्यांचे नावासमोर दर्शविलेल्या प्रमाणे मंजुर (परिवर्तीत/ अर्जित/ असाधरण (विनावेतन)) करण्यात येत आहे.

| **अ.क्र** | **पोलीस अधिकारी यांचे नाव** | **सध्याचे नेमणुकीचे ठिकाण** | **रुग्नविवेदन कालावधी** | **दिवस** | **मंजुर करण्यात आलेली रजा** |
|---|---|---|---|---|---|
| **०१** | श्री. नानाजी चौधरी, पोलीस उपनिरीक्षक | पो. स्टे. खोलापूरी गेट | दि. ११.०७.२०२३ ते २९.०७.२०२३ | **१९** | **परिवर्तीत रजा** |
| **०२** | श्री. गजानन उमाळे, पोलीस उपनिरीक्षक | नियंत्रण कक्ष | दि. २९.०७.२०२३ ते २८.०८.२०२३ | **३१** | **परिवर्तीत रजा** |
| **०३** | श्री. कदीर खान, पोलीस उपनिरीक्षक | पो. स्टे. बडनेरा | दि. २१.०७..२०२३ ते २९.०८.२०२३ | **३९** | **परिवर्तीत रजा** |
| **०४** | श्री. राजेंद्र गोसावी, पोलीस उपनिरीक्षक | पो. स्टे. गाडगेनगर | दि. १२.०७.२०२३ ते ०१.०८.२०२३ | **२१** | **परिवर्तीत रजा** |
| **०५** | श्री. रवि झाकर्डे, पोलीस उपनिरीक्षक | पो. स्टे. सिटी कोतवाली | दि. २८.०७.२०२३ ते ०९.०८.२०२३ | **१३** | **परिवर्तीत रजा** |
| **०६** | श्रीमती आरती गवई, पोलीस उपनिरीक्षक | पो. स्टे. राजापेठ | दि. १८.०५.२०२२ ते ०६.०६.२०२२ | **२०** | **परिवर्तीत रजा** |
| | | | दि. ०७.०६.२०२२ ते १३.०६.२०२२ | **०७** | **अर्जित रजा** |
| **०७** | श्रीमती मिनाक्षी बोचे, पोलीस उपनिरीक्षक | पो. स्टे. खोलापूरी गेट | दि. ०९.०८.२०२३ ते २८.०८.२०२३ | **२०** | **परिवर्तीत रजा** |

## भाग-२

## <u>शिक्षा/निलंबन/पुन्हा स्थापना/बक्षिस/सेवानिवृत्त/मयत/नाव कमीकरणे</u>

## <u>शिक्षा</u>

**१.पोआअ/विचौ-२/कसुरी/अंतिम आदेश/मपोशि-१६४६ मुंडाले/१५२९०/२०२३ अमरावती शहर**

**दिनांक १५/१२/२०२३**

**संदर्भ क्रमांक** :- १) पोलीस उपायुक्त, परिमंडळ-१, अमरावती शहर यांचे कडील जावक क्रमांक ५१०/२०२३, दिनांक २१/०३/२०२३ रोजीचा कसुरी अहवाल.

२) या कार्यालयाचे कारणे दाखवा नोटीस क्रमांक पोआअ/विचौ-२/कसुरी/का.दा.नो/ मपोकॉ-१६४६ मुंडाले/३६५८/२०२३ अमरावती शहर, दिनांक १८/०४/२०२३.

**कसुरदारचे नाव :-** मपोकॉ/१६४६ मिना मुंडाले, नेमणुक पोलीस स्टेशन गाडगेनगर, अमरावती शहर.

**थोडक्यात कसुर :-**

तुम्ही मपोकॉ/१६४६ मिना मुंडाले, पोलीस स्टेशन गाडगेनगर, अमरावती शहर येथे नेमणुकीस असुन नवरात्री महोत्सव तसेच बाहेरील विभागात मोठया प्रमाणावर बंदोबस्त असल्याने पो.स्टे.ला मनुष्यबळ कमी पडत असल्यामुळे तुम्हाला सिक रजेवर असतांना व.पो.नि.गाडगे नगर यांनी कर्तव्यावर हजर होण्याकरीता वारंवार तोंडी तसेच लेखी नोटीस देवुनही तुम्ही कर्तव्यावर हजर झाल्या नाही. तसेच तुम्ही दिनांक ०५/०९/२०२२ रोजी पासुन सिक रजेवर गेल्या असूनही आजपावेतो आजारी असल्याबाबत उपचारासंबधीत कोणतेही कागदपत्र अथवा वैद्यकीय अधिकारी यांचे प्रमाणपत्रही पो.स्टे.ला सादर केले नाही. तसेच स.पो.आ.गाडगे नगर यांनी तुम्हाला खुलासा सादर करणेसाठी त्यांचे आज्ञांकित कक्षात हजर राहणेबाबत कार्या.जावक क्र. ३९९८/२०२२, दिनांक ०७/११/२०२२ प्रमाणे नोटीस देवुन आज्ञांकित कक्षामध्ये हजर राहण्याबाबत कळविले असतांना तुम्ही आज्ञांकित कक्षात सुध्दा हजर आले नाहीत. तुम्ही पोलीस खात्यासारख्या शिस्तीच्या पोलीस दलामध्ये कर्तव्यावर असुन अशोभनीय असे वर्तन केले आहे. तुमच्या बेशिस्त, जाणीवपुर्वक, बेजबाबदार कृत्य हे अशोभनिय व हलगर्जीपणाचे असुन तुम्ही तुमच्या कर्तव्यात हलगर्जीपणा व निष्काळजीपणा करुन कर्तव्यात कसुर केलेला आहे.

अशा प्रकारे तुम्ही उपरोक्त कसुरी केल्याने तुमच्या या गैरवर्तन कसुरी बद्दल तुम्हास मुंबई पोलीस (शिक्षा व अपील) १९५६ नियम क्रमांक ३ (२) मधील (५) चे तरतुदी नुसार **पुढीलदेय वार्षीक वेतन वाढ एक (१) वर्षाकरीता (परिणाम न होता)** का ? रोखण्यात येवु नये म्हणुनकारणे दाखवा नोटीस देण्यात आली होती.सदर कारणे दाखवा नोटीस तुम्ही स्विकारली असुन त्यावर तुमचे स्पष्टीकरण सादर केलेले आहे. तरी तुम्हाला दिनांक ०८/१२/२०२३ रोजी तुमचे म्हणणे प्रत्यक्ष ऐकुण घेण्याकरीता मा.पोलीस आयुक्त, अमरावती शहर यांचे आज्ञांकित कक्षेत समक्ष बोलविण्यात आले असता तुम्ही आज्ञांकित कक्षेत हजर न होता आज्ञांकित कक्षेत गैरहजर राहिल्या. सादर केलेले स्पष्टीकरण संयुक्तीक व समाधानकारक नसुन तुम्हाला पुढील कर्तव्यात

कामामध्ये सुधारणा करण्याची एक संधी देण्यात येवुन प्रस्तावित कारणे दाखवा नोटीसमध्ये देण्यात आलेल्या शिक्षेमध्ये अंशत: बदल करुन खालील प्रमाणे अंतिम आदेश पारीत करण्यात येत आहे.

## अंतिम आदेश

वर नमुद कसुरदार यांनाउपरोक्त कसुरीबाबत मुंबई पोलीस (शिक्षा व अपील) १९५६ नियम क्रमांक ३ (२) (४) चे तरतुदी नुसार "**रु. ५००/- दंडाची शिक्षा देण्यात येत आहे.** उपरोक्त शिक्षेने कसुरदार व्यस्थीत होत असल्यास सदर आदेश प्राप्त झाल्याचे तारखेपासुन ६० दिवसाच्या आत मा.अपर मुख्य सचिव गृह विभाग, महाराष्ट्र शासन मंत्रालय, मुंबई यांना या कार्यालयाचे मार्फतीने अपिल अर्ज दोन प्रतित सादर करु शकता.

## भाग-३

## वेतन/संरचना/वेतन निश्चितीती/वार्षीक वेतनवाढ/संकीर्ण

## निरंक

**(सागर पाटील)**
पोलीस उपायुक्त (मुख्या.)
अमरावती शहर

प्रति,

पत्रव्यहार शाखा/सेवापट नोंदणी लिपीक/सीसीटीएनएस